पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/४/कावि/१०६७/२०१२
दिनांक- ७ /८/२०१२

प्रति,

मा.........................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा. महापालिका सभा दिनांक १७ / ०८ / २०१२ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत...

माननिय महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑगष्ट- २०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक १७/०८/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

सूचना

[ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्रमांक १ (ए)(एच)(आय) अन्वये. ]

कार्यपत्रिका क्रमांक- ७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे ऑगष्ट - २०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक १७.०८.२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

----

मा.महापालिका सभा क्र. ५ दि.२०/६/२०१२ व ९/७/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

प्रश्नोत्तरे

[ मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४४ अन्वये ]

-----------

मा. स्थायी समितीचे ठराव

विषय क्रमांक १) संदर्भ:- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. प्रशा/११/कावि/१०८३/१२ दि. २३/७/२०१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८४९ दि.३१/७/२०१२

शासन निर्णयात नमुद केल्यानुसार प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता देणेची मागणी मा.आयुक्त यांजकडुन करणेत आली असली तरी घरबांधणी अग्रीमसाठी वर्ग १ रुपये १५ लाख,वर्ग २ साठी रुपये १४ लाख,वर्ग ३ साठी रुपये १३ लाख, वर्ग ४ साठी रुपये १२ लाख मध्ये घर विकत घेणे अशक्य आहे. तसेच घरांच्या किंमती रुपये १५ लाखपेक्षा जास्त असल्यामुळे वर्ग १ ते ४ मधील सर्व अधिकारी व कर्मचा-यासाठी रुपये २० लाख घरबांधणी अग्रीम मंजुर करण्याची दुरुस्ती करुन त्यासह घरबांधणी व इतर अग्रीमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक २) संदर्भः- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.
जकात/१०/कावि/९९/१२ दि. १९/३/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक २१/०७/२०१२ ठराव क्र.३५
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८५२ दि.३१/७/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २००१ चे अनुसूची १ व २ मधील दर समानिकरणाकामी प्रस्तावा सोबत प्रपत्र अ जोडले असून त्यामध्ये प्रपत्र ब च्या यादीप्रमाणे एकूण १८ बाबींच्या नमूद मालावर प्रस्तावित केलेले सुधारित जकात दर कायम करणेस व त्या प्रमाणेचे अनुसुचीबाबत नागरिकांच्या हरकती सुचना मागविणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ३) संदर्भः- १) मा. जितेंद्र ननवरे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव
२) मा.विधी समिती सभा दिनांक २१/०७/२०१२ ठराव क्र.४३
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८५३ दि.३१/७/२०१२

प्रभाग स्तरावर स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, आरोग्य, प्रशासन, मलनिःसारण इ. विभागीय कामे करणेत येतात. सद्यस्थितीत प्रभाग स्तरावर प्रभाग अधिकारी यांना १०,००,०००/- पर्यंतच्या प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरी देणेचा अधिकार आहे. प्रभागाच्या कामकाजाचे व्याप्तीत वाढ झाल्यामुळे खर्च मर्यादा १०,००,०००/- ऐवजी २५,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरीचे अधिकार सर्व प्रभाग समित्यांना देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

------

## मा.विधी समितीचे ठराव

विषय क्रमांक ४) संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र
जा.क्र.बप्र/पापु/६९९/२०१२, दि. १६/०७/२०१२
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र. ४५ दि. ३/८/२०१२
.

जलक्षेत्र क्र.बी/४, बी/५, बी/६, बी/७, बी/८ परिसरातील व्हॉल्व ऑपरेशन करणेकामी मजूर कर्मचारी पुरविणेकामी १ वर्षासाठीचे र.रु.६१,१५,२५६/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-------

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

विषय क्रमांक ५) संदर्भ :-१) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.नरवि/कावि/१अ/१८३/१२ दि. ०२/०७/२०१२
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.३७ दि.१/८/२०१२

मौजे चिंचवड येथील आरक्षण क्र.१८५ विसंगत उद्योग (Non Confirming Industries ) या प्रस्तावाने बाधित होणा-या खाजगी मिळकतींचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(२) व भूसंपादन कायदा १८९४ चे तरतुदीनुसार भूसंपादन करावे लागणार असल्याने या भूसंपादनास व याकामी येणा-या खर्चास (संबंधित भूसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ६) संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.नरवि।कावि।च-होली।०१६।१२, दि.१६/०७/२०१२
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.४०
दि.१/८/२०१२

मौजे च-होली येथील प्रभाग क्रमांक ७ मधील रस्ते व आरक्षण भूसंपादनाबात मा.आमदार व मा.नगरसदस्य यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने प्रस्तावात नमूद विकास योजनेतील प्रस्तावाने बाधीत खाजगी मिळकतींचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतुदी तसेच भुसंपादन कायदा १८९४ प्रमाणे संपादन करणेस व येणा-या खर्चास ( भूसंपादन अधिकारी कळवतील ती रक्कम) मान्यता देणेकामी तसेच मनपा हद्दीतील मौजे च-होली येथील सर्व रस्त्याबाबत संबंधीतीत जागांचे जागा मालक यांचे मागणी नुसार मंजूर विकास आराखडयातील कोणत्याही रस्त्याची जागा मनपाच्या ताब्यात घेत असताना मनपाकडून आकारले जाणारे दर हे वाजवी दरापेक्षा जास्त असल्याने अनेक जागा मालक जागा ताब्यात देण्यासाठी तयार होत नाहीत या हद्दीतील पूर्वपश्चिम ९० मिटर रुंदीच्या रस्त्याबाबत एकही जागामालक मनपाने ठरवून दिलेले खडीमुरुमाचा रस्ता करण्याकरिता असलेला दर जास्त असल्याने जागा ताब्यात देत नाहीत. त्यामूळे या रस्त्याचे विकास कामास अडथळा होत असून सदर दर कमी करुन इतर रस्त्याप्रमाणेच हा खडीमुरुमा पर्यत ( WBM रस्ता) करणेत यावा व मनपाच्या ताब्यात देण्यासाठी र.रु.१४४०/- प्रति चौरस मिटर हा खर्च रद्द करणेत यावा यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ७) संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचेकडील
क्र.स्था।EWS।१२८।२०१२,दि. ३०/०७/२०१२
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.४५
दि. २/८/२०१२

आर्थिक दृष्टया दुर्बल घटकासाठी प्रस्तावात सविस्तर नमुद प्रमाणे २३०० घरे पूर्ण करावयाची झाल्यास महानगरपालिकेचा निश्चित हिस्सा १६.१४ कोटी इतका असणार आहे. परंतु निविदा दर वाढीव आले तर ती रक्कम, लाभार्थ्यांचा सध्या घेतला जाणारा हिस्सा र.रु.३,७६,०००/- पेक्षा जास्त येत असेल तर तो वाढीव खर्च महानगरपालिकेने सोसावा की लाभार्थ्यांनी या विषयी घोरणात्मक निर्णय घेणेची मागणी मा.आयुक्त यांजकडून करणेत आली आहे त्यामध्ये चिखली गायरान मधील २ हेक्टर जागा EWS साठी राखीव आहे. त्या ठिकाणी सुध्दा या प्रकल्पांतर्गत EWS चीच घरे घ्यावीत. जागा मनपाच्या ताब्यात आहे. तेथील झाडे काढून प्रकल्प राबवावा. तसेच मनपाने येत्या तीन ते चार महिन्यात ताब्यात येणारी सर्व EWS संबंधिची आरक्षणे यावर सुध्दा EWS प्रकल्पांतर्गत घरांचे नियोजन करावे. बांधकाम खर्चाचा हिस्सा लाभार्थ्यांकडून र.रु.३,७६,०००/- घेण्याचे मा.महापालिका सभा ठ.क्र.९९९, दि.२०/०९/२०१० अन्वये मान्य झालेले आहे. त्याप्रमाणेच यापुढेही लाभार्थ्यांकडून हिस्सा घ्यावा. त्यामध्ये वाढ करु नये व प्रकल्प त्वरेने पूर्ण करावा. सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेनंतर निविदा रकमेपेक्षा कमी दराची निविदा प्राप्त झाल्यास प्रत्यक्ष येणा-या खर्चास अनुसरुन प्रकल्पातील मुळ सुविधेत बदल न करता त्याचा फायदा लाभार्थ्यांना देण्यात यावा. तसेच या पुढील प्रकल्पात प्रत्येक मजल्यावर lift चा थांबा ठेवण्यात यावा. तसेच सदरची योजना सुसाध्य (viable) होणेकामी नगरविकास विभाग यांचे दिनांक २४/१२/२००८ च्या आदेशानुसार १५% चटई निर्देशांकाच्या विक्री घटकातून निधी उभारावा या प्रमाणेचा समावेश करुन त्यास मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ८) संदर्भ :- १) मा. गणेश लोंढे, मा. यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.४६
दि. २/८/२०१२

चिंचवड आरक्षण क्र. १८७ उद्यान या जागेचे भूसंपादन करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ९) संदर्भ :- १) मा. उल्हास शेट्टी, मा.सिमा सावळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.४७
दि. २/८/२०१२

पिंपरी चिंचवड मनपा शहर सुधारणा समिती या समितीच्या अधिकारामध्ये खालीलप्रमाणे विविध विभागांच्या कामांबाबत त्या विभागांचा कार्यअहवाल या समितीस मंजूरीसाठी पाठविण्यात यावा व या विभागांमध्ये मनपाच्या खालील विभागांचा समावेश असावा. वैद्यकीय विभाग, आरोग्य विभाग, भूमि - जिंदगी विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग, अग्निशमन विभाग, पाणीपुरवठा विभाग, मलनि:सारण विभाग, जकात विभाग, करसंकलन विभाग, विद्युत विभाग, पर्यावरण विभाग या विभागांच्या कामांचा कार्यअहवाल समितीस पाठविणेत यावा. तसेच शहर विकासाच्या अंमलबजावणीकामीचा कोणत्याही स्वरुपाचा धोरणात्मक निर्णय हा शहर सुधारणा समितीच्या मंजूरीकरीता पाठविणेकामी संबंधीत विभागांनी प्रशासकीय कार्यवाही करावी यांस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-------

<u>मा.विशेष समित्यांचे वृत्तांत</u>

<u>मा.विधी समिती</u>

विषय क्रमांक १०) अ) दि.६/७/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि. २०/७/२०१२ व २१/७/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

-------

<u>मा.महिला व बालकल्याण समिती</u>

विषय क्रमांक ११) अ) दि. २७/६/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि. ११/७/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

<u>मा.शहर सुधारणा समिती</u>

विषय क्रमांक १२) अ) दि. ५/६/२०१२ व १९/६/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि. ३/७/२०१२ व १७/७/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
क) १७/७/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

मा.क्रिडा समिती

विषय क्रमांक १३) अ) दि. २०/६/२०१२ व ४/७/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि. १८/७/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / १०६७ / २०१२
दिनांक :- ७/०८/ २०१२

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे [ डॉकेटस ] नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८,
## प्रपत्र - ब
## मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक ३५ दिनांक २१/०७/२०१२ चे लगत

| अ. क्र. | | वस्तुचे नाव | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १३ | अ) | सर्व प्रकारची सुकविलेली किंवा जतन केलेली फळे व कवचफळे डबाबंद मासळी, चीज, कन्फेक्शनरी, मुरंबा व जेली, आईसक्रिम, सर्व प्रकारचे पिठूळ अन, लोणची, कोको व कोकोच्या बीया, चॉकलेट्स, बिस्कटे व केक, प्राण्यांची पातळ चरबी (लार्ड ) किंवा प्राण्यांची खाद्य चरबी, मावा, दुधाची मलई, चक्का, फळांचे रस, सरबते व सर्व पेये, बेव्हरेजेस (उदा. कोकोकोला, पेप्सी इत्यादी सारखे) ग्लुकोज, डेस्ट्रोज किंवा कोणतीही कलशर्करा (खाद्य तेलाव्यतिरिक्त) तेल्याच्या दुकानातील माल, परिरक्षित किराणामाल, बेकिंग पावछर, सॅकरिन, सर्व प्रकारचे खाद्य रंग व अर्क, इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज, सातुचे वाळवीलेले सत्व, (माल्ट एक्स्ट्रॅक्ट) मध, पापड, सर्व प्रकारचे वेफर्स, शेवई, कोणत्याही वापरासाठी संस्करण केलेले मांस, स्कमड मिल्क पावडर, निरा व सर्व प्रकारचे अन किंवा पेय आणि सर्व प्रकारचे काजू व काजू बिया | ४.०० |
| | ब) | एरिएटेड वॉटर, मिनरल वॉटर, विशुध्द जल | ४.०० |
| ३१ | | फटाके, दारूकाम व त्याचे घटक, सेफ्टी फ्युज | ४.०० |
| ४४ | | सर्व प्रकारचे सिमेंट,सनला (सागोळ) | ४.०० |
| ४५ | | डांबर (कोल टार) अस्फाल्ट, बिटयूमेन, फरसबंदी दगड, मॅंगनिज,इमरी दगड किंवा खडी, दगडाच्या चिपा (स्टोन चिप्स) दगडाची धातूखळ, आग्रा दगड, इमारती दगड, डांबर मिश्रित धातूखळ, डांबर मिश्रित धातूखळ, डांबर मिश्रित कच (ग्रिट) सिमेंट मिश्रित खडी (तयार कॉंक्रीटचा माल) | ४.०० |
| ४६ | | चकाकी दिलेल्या विटा व फरशा (टाईल्स), संगमरवरी दगड, भटटीच्या विटा, विटा, सर्व प्रकारची छप्परी कौले,पलोअरींग टाईल्स,फरशीच्या लाद्या इ.चायना मोझाईक चिप्स, मोझाईकचा सगमरवरी दगड,मोझाईक किंवा टेरेझोची कौले, चिनी मातीचे पांईप, मातीचे पाईप, सिमेंटचे पाईप, अस्बेस्टॉस सिमेंट पत्रे,सिमेंटच्या कुंडया,नक्षीदार जाळया सारख्या वस्तू,सिमेंट ब्लॉक्स व ग्रॅनाइड | ४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५२ | | प्लायवूड, सॉपटबोर्ड, हार्डबोर्ड, मॅसोनाइड किंवा कोणतेही घटक असलेले व कृत्रिम प्रक्रियेने तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड व त्यापासून तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड व त्यापासून तयार केलेल्या वस्तू व सर्व प्रकारचे फर्निचर, सनमायका, फॉरमायका आणि सर्व प्रकारचे प्लायवूडस् | ४.०० |
| ५३ | अ) | केसाचे तेल , सुगंधी तेले, सर्व् प्रकारचे सुगंधी द्रव्ये, सेंटस् , अत्तरे, सुगंधीत वस्तू, उदबत्या, सुगंधी रसायने, प्रसाधनगृहांसाठी आवश्यक असणा-या सर्व प्रकारच्या वस्तू, दाढीचे क्रीम, दाढीचा साबण, दंतमंजन, दाताची पेस्ट, पोमेड, फण्या, कंगवे, ब्रश, केसाच्या पिना, ब्रेसेस, गार्टर्स, सस्पेंडर्स, उदा.धूप, लोबान | ४.०० |
| ५३ | क) १ | लेसेस,टेप्स, लाकडी व धातूच्या रिंग्ज,भरतकामाच्या वस्तू, सेल्यूलाईड व सेल्यूलाईडच्या वस्तू, सर्व प्रकारचे मणी, कृत्रीम मोती, बेकेलरइट व बेकेलाइडच्या वस्तू, हस्तीदंत व हाडे यापासून बनविलेल्या वस्तू, सर्व प्रकारची बटणे(शर्ट इ.वस्तूंचे) ि करकोळ जिनस, हॅबरडॅशरी, बूट लेसेस ब्लँको, ब्रासो,छत्र्या व छत्र्यांचे सामान, काठया,चाबूक, टेप्स, कॅनव्हासच्या पिशव्या, होल्डॉल्स,प्लेइंग बॉल्स, गोटया, पॉलिश पेपर्स,बुचे,गंध, फिशिंग रॉड आणि इतर फॅन्सी गुडस्, रक्षाबंधनाच्या राख्या | ४.०० |
| ५३ | क(३) | सर्व प्रकारच्या प्लॅस्टीक पिशव्या | ८.०० |
| ५३ | ड) | लाकडी, लोखंडी, पोलादी, वेताचे, प्लॅस्टीक व फायबर इ.सारखे सर्व प्रकारचे फर्निचर | ४.०० |
| ७४ | ई) | संगणक त्यांचे घटक व सुटे भाग व संगणकाच्या मायक्रोचिप्स, कुलिंग सिक्स्टम बनवण्यासाठी आयात होणारा माल, फ्लॉपी, सीडी, बॅकअप मशिन, कार्टेज, सर्व प्रकारचे सॉफ्टवेअर अशा व इतर वस्तू. | ४.०० |
| | ह) | मोबाईल, पेजर, सिमकार्ड, सिमकार्ड ॲक्क्टवेशन/ रिन्युअल स्लीप कुपन इत्यादी. | ४.०० |
| ७५ | अ) १) | मोटारी, मालमोटारी, सर्व प्रकारची साधने, कार, बसेस, क्रेन, ट्रेलर, टेम्पो, रिक्षा, फोर्कलिफ्ट, एक्सेव्हेटर्स, सर्व प्रकारची प्रवासी साधने, रोडरोलर्स, बुलडोजर्स, ट्रॅक्टर्स, कॉंक्रिट मिक्सर, जीप, सर्व प्रकारच्या वाहनांच्या चॅसीज तसेच विशेष रित्या तरतूद न करण्यात आलेली सर्व प्रकारची देशी व विदेशी वाहने. | ४.०० |
| | | मोटर सायकल, स्कूटर्स, मोपेड्स | |
| ७६ | अ) | उपकरणे, उपकरण संचा व उपयंत्रे व त्यांचे भाग शिवणयंत्रे व शिवणकाम व विणकामाची एम्ब्रॉयडरी यंत्र, ओव्हर लॉकिंग व इंटरलॉकिंग यंत्र, सर्व प्रकारची सर्व घडयाळे, टंकलेखन यंत्र, इलेक्ट्रॅानिक टंकलेखन यंत्र व त्यांचे सुटे भाग व घटक भाग. | ४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७६ | ब) १) | रेडिओग्राम उपकरण संच, ग्रामोफोन्स, ॲम्प्लिफायर्स, वायरलेस (यंत्र), सर्व प्रकारची संगीत वाद्ये, ऑडिओ-व्हिडिओ कॅसेट्स, मायक्रोफोन्स, व्हिडिओ गेम्स, वॉकमन, टेलिफोन संच, फॅक्स संच, दूरध्वनी संचासाठी वापरण्यात येणारे अंतर्गत साहित्य, लॅपटॉप संच, इंटरनेट आणि वेबसाईट मशीनरी आणि त्यांचे घटक भाग, सुटे भाग आणि पूरक भाग, तयार (रेडिमेड) रेडिओ, टेपरेकॉर्डर दूरदर्शन संच, सर्व प्रकारचे स्पिकर्स, सीडी प्लेअर, डिव्हीडी, व्हिसीडी आणि व्हिसीआर. | ४.०० |
| ७६ | ब) २) | सर्व प्रकारचे रेडिओ, दूरदर्शन संच, सर्व प्रकारचे स्पिकर, साउंड सिस्टम, टेपरेकॉर्डर, सीडी प्लेअर, डिव्हीडी, व्हिसीडी आणि व्हिसीआर तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे घटक व सुटे भाग तथापि, इतरत्र विशिष्टरित्या नमूद केलेले घटक भाग, सुटे भाग, पूरक भाग वगळून. | ४.०० |
| ८६ | | वरील कोणत्याही बाबीत समाविष्ट न केलेल्या व अनुसूची २ मध्ये विशेषतः सूट देण्यात न आलेल्या माल व वस्तू | ४.०० |
| | | | |

**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.